# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक : २५६०११८१-८२
फॅक्स : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई-मेल : regis@unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे-४११००७.

Ref No:- ICC/20/2021.
Date :- 29/7/2021

प्रति,
मा. प्राचार्य
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये

**विषय** –महाविद्यालयामधील 'अंतर्गत समिती' बाबतची माहिती प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेत आणि महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर देण्याबाबत

**संदर्भ** – महिला व बालविकास महाराष्ट्र राज्य, यांचे दि.२५/०५/२०२१ चे पत्र क्रमांक आवक / क्र.आर /२९७५,दिनांक २५/०५/२०२१

महोदय,

प्रत्येक महाविद्यालयामध्ये 'कामाच्या ठिकाणी स्त्रियांची होणारी लैंगिक छळवणूक २०१३-प्रतिबंध,मनाई व निवारण' याकायद्याअन्वये अंतर्गत समितीची स्थापना करणे बंधनकारक आहे. त्यानुसार आणि विद्यापीठाकडून आपल्याला वेळोवेळी पाठवण्यात आलेल्या निर्देशानुसार आपल्या महाविद्यालयात अंतर्गत समिती स्थापन झाली असेलच. त्याबाबतची माहिती आपण विद्यापीठाकडे पाठवली नसल्यास त्वरित पाठवावी.

तसेच लैंगिक छळवणूक या विषयावर महाविद्यालयामध्ये जनजागृतीकरण्यासाठी तसेच त्याला आळा घालण्यासाठी **प्रवेश प्रकियेसाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेत** आणि आपल्या **संकेतस्थळावर** महाविद्यालयाचा प्रवेशद्वारा जवळ दर्शनी ठिकाणी अंतर्गत समितीचा फलक सदस्यचा माहिती व संपर्क तपशीलासह असावा .महाविद्यालयात कार्यरत असलेल्या अंतर्गत समितीची माहिती द्यावी. (संदर्भ –महिला व बालविकास महाराष्ट्र राज्य यांजकडून प्राप्त पत्र) यामध्येपुढील माहितीचा समावेश केलेला असावा:

- महाविद्यालयात कार्यरत अंतर्गत समितीच्या सदस्याची माहिती व संपर्क तपशील
- लैंगिक छळवणूकसंदर्भात कायद्याचे स्वरूप
- संपर्क करण्यासाठी दूरध्वनी क्रमांक, इमेल आयडी तसेच व्यवस्थित पत्ता

आपला,

(डॉ.प्रफुल्ल अ. पवार)
कुलसचिव